# जीपी **पारसिक** सहकारी बँक लि.

(मल्टी–स्टेट शेड्युल्ड बँक)

कळवा, ठाणे - ४०० ६०५.

(रजि. नं. एमएससीएस/सीआर/१२१३/२०१५ दि.२६/०३/२०१५)

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

बँकेची ५३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. ०१ सप्टेंबर, २०२४** रोजी सकाळी १०.३० वाजता खालील विषयांकरिता **'डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह', हिरानंदानी मिडोज-२ जवळ, घोडबंदर रोड, मानपाडा-ठाणे (प.)-४००६०७** येथे घेण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

## सभेपुढील विषय

१) दि. ०६ ऑगस्ट, २०२३ रोजी झालेल्या ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृतांत वाचून कायम करणे.

२) वार्षिक अहवाल विचारार्थ  ठेवणे व त्यास मंजुरी देणे ज्यामध्ये संचालक मंडळ अहवाल, दि. ३१ मार्च, २०२४ अखेरचा वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल, नफा-तोटा पत्रक व ताळेबंद पत्रक यांचा समावेश आहे.

३) सन २०२२-२३ सालच्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालाच्या दोषदुरुस्ती रिपोर्टला मान्यता देणे.

४) संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार दि. ३१ मार्च, २०२४ अखेरच्या नफा वाटणीस व लाभांश वाटणीस मंजुरी देणे.

५) सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

६) बँकेच्या सध्याच्या पोटनियमांमधील दुरुस्त्यांबाबत संचालक मंडळाने केलेल्या शिफारशींचा (सोबत मसुदा) विचार करणे व त्यास मान्यता देणे (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व सेंट्रल रजिस्ट्रार, नवी दिल्ली यांचे मंजुरीस अधीन राहून)

७) बँकेच्या उपविधी क्र. 11 a(ii ) नुसार २० पेक्षा कमी भागधारण असलेल्या सभासदांबद्दल निर्णय घेणे.

८) सन २०२४-२५ करिता वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे व त्यांचे सेवा शुल्क ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे.  संचालक मंडळाच्या शिफारशीनुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे मे. एन. एस. गोखले ॲण्ड कंपनी चार्टर्ड अकौंटंटस् यांची सन २०२४-२५ करिता वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नेमणूक करण्याचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

९) सर्वसाधारण सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर राहिल्यास त्यांची रजा मंजूर करणे.

१०) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार

**डॉ. एम. डी. पै**

मुख्य कार्यकारी अधिकारी

**दिनांक : १४/०८/२०२४**

**ठिकाण : पारसिक नगर, कळवा, ठाणे - ४००६०५.**

---

टिप : १) गणपूर्तीअभावी सभा तहकूब झाल्यास सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल व त्या सभेस पोटनियम क्र. ३० (c) नुसार गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.

२) ज्या सभासदांना वार्षिक सभेत काही सूचना करावयाच्या किंवा प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दि. २२/०८/२०२४ पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत त्यांच्या सूचना अथवा प्रश्न लेखी स्वरुपात द्यावेत. दि. २२/०८/२०२४ पर्यंत दिलेल्या मुदतीत लेखी स्वरुपात आलेल्या सूचना अथवा प्रश्नांचीच दखल घेण्यात येईल.

३) सभासदांव्यतिरिक्त अन्य कोणासही प्रवेश दिला जाणार नाही.

४) वार्षिक अहवाल व नोटीसची प्रत बँकेच्या वेबसाईट **www.gpparsikbank.com** वर प्रसारित केली आहे.

५) बँकेचा वार्षिक अहवाल आपल्या जवळच्या शाखेत उपलब्ध असून सभासदांनी घेऊन जावा.